# बचत गट आणि महिला सशक्तिकरण

**प्रा. सुप्रिया रविंद्र नाळे** मुधोजी महाविद्यालय, फलटण supriyanale86@gmail.com

---

**सारांश :-**

महिलांना खऱ्या अर्थाने स्वावलंबी करायचे असेल तर आर्थिक पाठबळाची गरज आहे. हे आर्थिक पाठबळ प्राप्त व्हावे म्हणून भारत सरकारने स्वयंसहायता गटातील महिलांसाठी विविध योजना अस्तित्वात आणल्या आहेत. या विविध योजनेचा अवलंब करून महिला सशक्त झाल्या आहेत.

**प्रस्तावना :-**

भारत हा कृषिप्रधान देश असून, आजही भारतातील काही महिलांना आर्थिक दृष्ट्या राहावे लागते. या ग्रामीण व शहरी भागातील महिला स्वावलंबी व्हाव्यात तसेच उद्योजिका बनाव्यात. यासाठी भारत सरकारने बँकाशी संलग्न असणाऱ्या स्वयंसहाय्यता बचत गटाच्या सदस्य महिलांसाठी दोन टक्के व्याजदराने कर्ज पुरवठा केला जातो. त्याकरिता भारत सरकारने विविध योजनाचा आधार घेऊन पुरवठा केला जात आहे व या केलेल्या कर्ज पुरवठ्यामुळे ज्या महिला फक्त घर आणि मुले सांभाळत होती ती आता उद्योजिका बनल्या आहेत.

**संशोधन विषयाच्या उद्दिष्टे :-**

1. भारतातील बचत गटाची संकल्पना समजावून घेणे.
2. महाराष्ट्रातील बचत गटाची सद्यस्थिती अभ्यास करणे.
3. बचत गटाद्वारे किती महिला स्वावलंबी ( उद्योजिका) झाल्या याची माहिती मिळवणे.
4. भारतातील विविध योजनाचा आढावा घेणे.

**संशोधन विषयाची गृहीतके :-**

1. बचत गट व महिला सक्षमीकरणासाठी भारत सरकारने योजना राबवल्या आहेत.
2. अंतर्गत SGH अंतर्गत स्वावलंबी बनल्या आहेत.

**संशोधन पद्धती :-**

बचत गट आणि महिला सक्षमीकरण याचा अभ्यास करताना दुय्यम सामग्रीचा वापर केला आहे त्यामध्ये प्रामुख्याने राज्य आणि केंद्र सरकारच्या वेबसाईटवर उपलब्ध असलेली माहिती तसेच स्वयंसहाय्यता गटावर संशोधित आधारित आहे.

**बचत गटाचा इतिहास :-**

डॉ. मोहम्मद युनिस यांनी 1983 मध्ये बांगलादेशात बचत गटाचे बीज रवले. याच धर्तीवर भारतामध्ये 1990 च्या दशकात नाबार्ड, राज्य सरकार आणि केंद्र सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामीण विकासाच्या योजना राबविल्या जात आहेत.

**बचत गटाची व्याख्या :-**

" नियमित केलेल्या अल्पबचतीमधून आर्थिक सहाय्य करण्यासाठी भांडवल उभारण्यासाठी, संघटित शक्ती वाढविण्यासाठी, परस्पर सहकार्याने व सभासदांच्या नेतृत्वाने तयार केलेला गट म्हणजे बचत गट होय."

बचत गट म्हणजे स्वयं-सहायता गट (Self-Help Group - SHG), जो महिलांना किंवा लहान व्यवसायिकांना आर्थिक मदत आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देतो. शासन विविध योजनांद्वारे बचत गटांना मदत करत असते. ज्या योजनेमुळे महिला सक्षमीकरण झालेल्या आहेत भारत सरकारच्या काही महत्त्वाच्या योजना पुढीलप्रमाणे आहेत :-

**भारत सरकारच्या विविध योजना :-**

1. दीन दयाल अंत्योदय योजना - राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान (DAY-NRLM)
2. प्रधानमंत्री मुद्रा योजना ( PMMY)
3. स्टॅन्ड-अप इंडिया योजना
4. महिला आर्थिक विकास महामंडळ (MVIM)

बचत गट व महिला सक्षमीकरणासाठी विविध योजना सरकारने चालू केल्या आहेत. या योजनेची सरकारची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे :-

1. महिलांच्या सक्षमीकरणासाठी कौशल्य विकास, प्रशिक्षण आणि मार्केटिंग संधी उपलब्ध करून दिल्या.
2. बचत गटातील महिला आणि लघु उद्योजकांना बँक सहाय्यता आणि मार्गदर्शन मिळते.

3. स्टँड अप इंडिया या योजने अंतर्गत महिला उद्योजक आणि अनुसूचित जाती जमातीच्या सदस्यांना रु. 10 लागते रुपये 1 कोटी पर्यंतचे कर्ज दिले गेले.
4. बचत गटातील महिलांसाठी विशेषतः कृषी आणि अन्न प्रक्रिया उद्योगांसाठी प्रकल्प सुरू करण्यात आले.

DAY-NRLM, PMMY, MAVIM आणि Stand-up India अंतर्गत महिला उद्योगांचे सक्षमीकरण करण्यासाठी महिलांच्या उद्योजकतेला चालना देण्यासाठी भारत सरकारने विविध योजना राबविलेल्या आहेत महाराष्ट्र आणि संपूर्ण भारतात लाखो महिलांनी या योजनेंद्वारे फायदा घेऊन व्यवसाय सुरू केले आहेत प्रत्येक योजना अंतर्गत महिला उद्योजकाचा आढावा पुढीलप्रमाणे :-

( L(लाख), cr (कोटी))

| शासकीययोजनांची नावे | एकूण स्वयं सहाय्यता बचत गट | | महिला सदस्य | | योजनेद्वारे महिला स्वयं सहायता गटाला केलेला कर्ज पुरवठा | | महिला उद्योजिका | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र | सातारा | महाराष्ट्र | सातारा | महाराष्ट्र | सातारा | महाराष्ट्र | सातारा |
| DAY-NRLM | 4.5 ल L | 25,000 | 50 L | 2.5 L | 5,000 cr | 250 cr | 3 L | 30,000 |
| PMMY | 1.5 L | 8000 | 2 cr. | 1.5 L | 60,000 cr | 1200 cr | 2 cr | 1.5 L |
| MAVIM | 50,000 | 7500 | 5 L | 50,000 | 1500 cr | 75 cr | 2.5 L | 10000 |
| Stand-up India | 15,000 | 2000 | 2 L | 15,000 | 5000 cr | 150 cr | 15000 | 2000 |

योजनेचा आधार घेऊन महिलांनी जे व्यवसाय चालू केले ते पुढील प्रमाणे :-

1. DAY-NRLM द्वारे ग्रामीण भागातील महिलांनी अन्नप्रक्रिया, दुग्ध व्यवसाय, हस्तकला आणि कृषी पूरक व्यवसाय सुरू केले आहेत.
2. PMMY द्वारे महाराष्ट्रातील ग्रामीण व शहरी भागातील महिलांना टिफिन सेवा, किराणा दुकान, बेकरी, शिवणकाम, दुग्ध व्यवसाय सुरू केले आहेत.
3. MAVIM द्वारे महिला कृषीपूरक उद्योग अन्नप्रक्रिया, कापड व्यवसाय, हस्तकला आणि इलेक्ट्रॉनिक दुकानांमध्ये उद्योजिका झालेल्या आहेत.
4. Stand-up द्वारे अनेक महिलांनी छोटे स्टार्टअप मॅन्युफॅक्चरिंग युनिट आणि सेवा उद्योग सुरू केले आहेत.

**निष्कर्ष** :-

1. महाराष्ट्रात 6.65 लाखाहून अधिक महिला बचत गट (SHG) कार्यरत आहेत.
2. सातारा जिल्ह्यात 42,500 + महिला बचत गट कार्यरत आहेत यामध्ये सुमारे 5 लाख महिला सदस्य आहेत.
3. सातारा जिल्ह्यातील सुमारे 1.92 लाख महिला विविध शासकीय योजनांमुळे उद्योजिका झाल्या आहेत.
4. महाराष्ट्रात 2 कोटी हुन अधिक महिला या योजनेमुळे लघु व मध्यम उद्योगात प्रवेश करून स्वावलंबी झाल्या आहेत.

**संदर्भसूची** :-

1. Progress of SHG - Bank linkage in India2020-21
2. Status of Microfinance in India 2023-24
3. महिला बचत गटाचे विविध पैलू संपादक डॉ. सुनील शिंदे.
4. प्रथम आवृत्ती एप्रिल 2019
5. शासकीय योजना ज्ञानदीप अकॅडमी